



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

स्वत:ला कधीही कमी लेखू नका
तुमच्या आत्मविश्वासाने
अशक्य गोष्टी सुद्धा
शक्य होऊ शकतात.


वर्ष : ०५ | अंक : ८२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०५ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# निवडणूक आयोगाचा राज्यातील विरोधकांना दणका !

## २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला मतमोजणी






**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. राज्य निवडणूक आयोगाची आज अतिशय महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेला राज्य निडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे, सचिव सुरेश काकाने, उपसचिव सुर्यकृष्ण मूर्ती, उपायुक्त राजेंद्र पाटील उपस्थित होते. यावेळी आयुक्त दिनेश वाघमारे यांनी राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींचा कार्यक्रम जाहीर केला. या सर्व नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी येत्या २ डिसेंबरला मतदान होणार आहे. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी ३ डिसेंबरला मतमोजनी होणार आहे

निवडणुकीचा कार्यक्रम कसा असेल?

नगर परिषद आणि नगर पंचायत यांचा प्रत्यक्ष कार्यक्रम जाहीर करत आहोत. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची सुरुवात ही १० नोव्हेंबर २०२५ पासून होईल. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम मुदत ही १७ नोव्हेंबर २०२५ असेल. नामनिर्देशन पत्राची १८ नोव्हेंबर २०२५ ला छाननी होईल. अपील नसलेल्या ठिकाणी नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याची मुदत ही २१ नोव्हेंबर २०२५ असेल. अपील असलेल्या ठिकाणी नामनिर्देशन पत्र माघार घेण्याची अंतिम मुदत २५ नोव्हेंबर २०२५ असेल, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली.

निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी ही २६ नोव्हेंबर २०२५ ला जाहीर होईल. मतदानाचा दिवस हा २ डिसेंबर २०२५ असेल आणि मतमोजणीचा दिवस ३ डिसेंबर २०२५ असेल. शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करण्याचा दिवस हा १० डिसेंबर २०२५ असेल, अशी महत्त्वाची माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली.

**निवडणूक आयुक्तांनी दिली महत्त्वाची माहिती**

सर्वाच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देस दिले आहेत. त्या दृष्टीने आपल्याशी संवाद साधावा आणि आपल्या मार्फत हा संदेश पोहोचवण्यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित केलेली आहे. ही पत्रकार परिषद फक्त नगर परिषद आणि नगर पंचायती संदर्भात आहे. राज्यातील पात्र असलेल्या २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत. यामध्ये एकूण ८६८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड होणार आहे. २४६ नगर परिषदांमध्ये १० नवनिर्वाचित नगरपरिषदांचा समावेश आहे. २३६ नगर परिषदांची मुदत यापूर्वीच संपलेली आहे. राज्यात एकूण १४७ नगरपंचायती आहेत. त्यापैकी ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक होत आहे. त्यामध्ये १५ नवनिर्वाचित आहे. तर २७ नगरपंतायतींची मुदत यापूर्वी संपलेली आहे. उर्वरित १०५ नगरपंतायतींची मुदत समाप्त झालेली नाही.

नगर परिषदांची सदस्य संख्या ही २० ते ७५ आहे आणि नगर पंचायतची सदस्य संख्या ही १७ आहे. नगर परिषदेची निवडणूक ही बहुसदस्य पद्धतीने आहे. साधारण एका प्रभागामध्ये दोन जागा नगर परिषदेमध्ये असतात. पण नगर परिषदेचा सदस्य संख्या विषम असेल तर एका प्रभागात तीन जागा असतात. साधारणत: मतदारांना दोन ते तीन सदस्यांसाठी मतदान करावं लागेल. याशिवाय नगर परिषदेचा एक अध्यक्ष राहील त्याच्यासाठी देखील मतदान करावं लागेल.

नगर पंचायतीमध्ये एक सदस्य आणि एक अध्यक्ष असतो. त्यामुळे तिथे मतदारांना २ मते द्यावी लागतील.

नामनिर्देशन हे निवडणूक आयोगाने निर्माण केलेल्या संकेतस्थळावर स्वीकारले जातील. एका प्रभागाम्ये एका उमेदवाराला जास्तीत जास्त चार नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील. यासोबत जात वैधता प्रमाणपत्र आवश्यकता आहे. ज्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे त्यांना अर्ज केल्याची पावती जमा करावी लागील. पण असा उमेदवार निवडून आला तर त्याला निवडून आल्यानंतर सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र देणं आवश्यक राहील.

नगर परिषद आणि नगर पंचायतींसाठी मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. मतदान केंद्र निहाय मतदान याद्या ७ नोव्हेंबरला जाहीर होणार आहे.

उमेदवारांसाठी खर्च मर्यादा वाढवण्यात आली आहे. अ वर्ग नगर परिषदेसाठी सदस्य पदासाठी ५ लाख आणि अध्यक्ष पदासाठी १५ लाख, ब वर्गासाठी अध्यक्ष पदासाठी ११ लाख २५ हजार आणि सदस्य पदासाठी ३ लाख ५० हजार, क वर्गासाठी अध्यक्ष पदासाठी ७ लाख ५० हजार आणि सदस्य पदासाठी २ लाख ५० हजार. नगरपंचायतीसाठी अध्यक्ष पदासाठी ६ लाख आणि सदस्य पदासाठी २ लाख २५ हजार अशी खर्चाची मर्यादा आहे.

मतदारांसाठी जे संकेतस्थळ विकसित केली आहे त्याम ध्ये सर्च फॅसिलिटी दिली आहे. त्यामध्ये मतादारांना त्यांचं नाव आणि मतदान केंद्र शोधता येईल. मतदारांसाठी मोबाईल ॲप तयार केलं आहे. त्यामध्ये तुमच्या उमेदवारांविषयी आणि इतर सर्व माहिती मिळेल.

## बुलढाणा येथे 'प्रगती सार्वजनिक वाचनालय' लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, नागपूर :** ज्ञान, संस्कृती आणि प्रबोधनाचा वारसा पुढील पिढीकडे पोहोचविण्याच्या उद्देशाने बांधण्यात आलेल्या 'प्रगती सार्वजनिक वाचनालय' या नव्या इमारतीचा लोकार्पण सोहळा शाहूनगर, बुलढाणा येथे उत्साहात पार पडला. बुलढाणा विधानसभा आ. संजय गायकवाड यांच्या संकल्पनेतून आणि प्रयत्नांतून ६० लक्ष रुपये निधीतून उभारलेले हे आधुनिक वाचनालय बुलढाणा शहराला एक नवे बौद्धिक आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून लाभले आहे. ही इमारत सर्व आधुनिक सुविधांनी सुसज्ज असून, प्रशस्त वाचनकक्ष, डिजिटल लायब्ररी, स्पर्धा परीक्षांसाठी स्वतंत्र अभ्यास विभाग, दिव्यांगांसाठी सुलभ प्रवेश, तसेच महिलांसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे शहरातील विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक आणि नागरिकांसाठी वाचनाची समृद्ध सुविधा निर्माण झाली आहे. वाचन हे समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या डिजिटल युगात वाचनालयांचे महत्त्व अधिक वाढले आहे. हे वाचनालय केवळ ज्ञानसंग्रहाचे ठिकाण नसून चिंतन, संस्कार आणि समाजजागृतीचे केंद्र ठरणार आहे. वाचनाची गोडी आणि ज्ञानाची भूक प्रत्येक तरुणामध्ये निर्माण व्हावी हेच माझे ध्येय आहे. या वाचनालयाच्या निर्मितीत योगदान देणारे स्वर्गीय प्रा. डॉ. सदाशिव कुल्ली यांचे आ.गायकवाड यांनी स्मरण केले आणि त्यांना आदरांजली अर्पण केली. तसेच या उपक्रमाला हातभार लावणाऱ्या सर्व दानशूर व्यक्ती, अभियंते, साहित्यिक आणि समाजसेवकांचे आ. संजय गायकवाड यांनी मनःपूर्वक आभार मानले.

या सोहळ्याला आ. संजय गायकवाड, महाराष्ट्र राज्य युवासेना कार्यकारिणी सदस्य युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे, शिवसेना मुख्य पक्ष निरीक्षक विजय अंभोरे, शिवसेना जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत, शिक्षणाधिकारी वाघ साहेब, भाजप ज्येष्ठ नेते व्ही.डी. पाटील, शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटक जिजाबाई राठोड, जिल्हा सम न्वयक अनुजाताई सावळे, शहरप्रमुख गजेंद्र दांदडे, शुभांगीताई भोंडे, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र काळे, शासकीय कंत्राटदार बंडू आसाबे, डॉ. मनोहर तुपकर, एस.एम. कानडजे, अण्णासाहेब म्हळसणे, राजेंद्र गणगे, प्रसिद्ध कादंबरीकार सदानंद देशमुख, प्रा. किं. वा. वाघ, रविकिरण टाकळकर, पुरुषोत्तम गणगे, विनोद देशमुख, शहिनाताई पठाण, मुकुंद पारवे, प्रज्ञा लांजेवार, डॉ. विजया काकडे, शोभा पवार, पंजाबराव गायकवाड, संजय हाडे, नगरसेवक बाळासाहेब धूड, अमित ठाकरे, कर्नल सुहास जतकर, शैलेश कुलकर्णी, डॉ. प्रभाकर पडघान, नगरसेवक दीपक सोनुने, डॉ. गजेंद्र निकम, डॉ. गणेश गायकवाड, श्रीकृष्णभाऊ शिंदे, दामोदर बिडवे, अनिकेत शेवाळे, नगरपरिषद बांधकाम अभियंता अजय मापारी, तसेच प्रगती वाचनालयाचे सभासद, भगतसिंग क्रीडा एज्युकेशन सोसायटीचे सदस्य, साहित्यिक आणि नागरिक उपस्थित होते.

## 'पत्रकार परिषद बघून तळपायाची आग मस्तकात गेली', राज ठाकरेंचा घणाघात !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाची आज पत्रकार परिषद पार पडली. या निवडणुकीत राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींचील निवडणूक घोषित केली. यावेळी पत्रकारांनी राज्य निवडणूक आयुक्तांना दुबार मतदार, मतदान याद्यांमधील घोळ याबाबत अनेक प्रश्न विचारले. त्यावर दिनेश वाघमारे यांनी उत्तर देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. पण म हाराष्ट्रातील सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या प्रश्नांवर केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आपल्याला त्याबाबत कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही, असं उत्तर त्यांनी एका प्रश्नावर दिलं. राज ठाकरे यांनी आयुक्तांच्या पत्रकार परिषदेची एक क्लिप शेअर करत टीका केली आहे.

आजच्या निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेची क्लिप मला कोणीतरी पाठवली. ती पाहून तळपायाची आग मस्तकात गेली! आणि आता १००% खात्री पटली की निवडणूक आयोग स्वायत्त आहे हे फक्त संविधानात आहे. हे सत्ताधाऱ्यांच्या हातचं बाहुलं आहे. दुबार मतदार नोंदणीपासून, ते मतदार यादीतील अनेक घोळ या सगळ्यावर एकही प्रश्न विचारल्यावर जर निवडणूक आयोगाला एकही उत्तर देता येत नसेल किंवा द्यायची इच्छा नसेल तर तुमचा उपयोग काय? जबाबदारी तर तुम्ही केंव्हाच झटकली आहेत, आत्ता उत्तरदायित्व पण नाकारणार, मग तुमच्या पदांच करायचं काय?, असे सवाल राज ठाकरे यांनी केले आहेत. म हाराष्ट्रातील जनतेने ही क्लिप जरूर पाहा. तुमच्या मतदानाचा ढळढळीत अपमानाचा उगम कुठून आहे हे तुम्हाला कळेल. बाकी या पत्रकार परिषदेत प्रश्न विचारून निवडणूक आयोगाची भंबेरी उडवणाऱ्या पत्रकारांचं म नापासून अभिनंदन, असं राज ठाकरे म्हणाले आहेत.

**राज ठाकरेंनी शेअर केलेल्या व्हिडीओत काय?**

राज ठाकरेंनी शेअर केलेल्या व्हिडीओ पत्रकार मतदार याद्यांमधील घोळबाबत प्रश्न विचारताना दिसतोय. सुलभ शौचालयाच्या पत्त्यावर शेकडो मतदारांची नोंद झालीय. त्यावर काय सांगाल? त्यावर आम्ही केंद्रीय निवडणूकआयोगाकडून मतदार यादी घेतो, असं उत्तर आयुक्तांनी दिलं. त्यावर पत्रकार म तदार याद्यांवर तुमचा वचक नाही का? असा प्रश्न विचारतो. त्यावर आम्ही फक्त ती यादी ॲडॉप्ट करतो, असं उत्तर आयुक्तांनी दिलं. मग मतदारयाद्यांची शहानिशा कोण करतं? असा प्रश्न पत्रकाराने विचारला. त्यावर त्यांनी उत्तर दिलं.

आम्ही शाहानिशा देखील करतो. दुबार मतदारअसतील तर बघतो. चुकीच्या प्रभागात गेलं का ते आम्ही बघतो. विधानसभेच्या यादी नाव आहे, पण यामध्ये नसेल तर ते आम्ही बघतो. काही चुका असतील तर ते आम्ही करतो, असं आयुक्त म्हणाले.

ज्या ठिकाणी जागाच नाही तिथे मतदारांचा पत्ता नोंद आहे. त्याबाबत कुणाची तरी जबाबदारी असेल ना? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. प्रत्येक प्राधिकरणाची जबाबदारी निश्चित केलेली आहे. राज्य निवडणूक आयोगाचीजी जबाबदारी आहे ती राज्य निवडणूक आयोगाची आहे. भारत निवडणूक आयोगाचे जे अधिकार आहे ते भारत निवडणूक आयोगाचे आहेत, असं उत्तर आयुक्तांनी दिलं.

## नवी मुंबई मनपा लोकशाही दिन ०१ डिसेंबर रोजी

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, नवी मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी म हानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या अनुषंगाने आज दि. ३ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही दिनात प्राप्त एका अर्जावर सुनावणी घेऊन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अतिक्रमण विभागाला कार्यवाहीचे आदेश दिले.

या पुढील माहे डिसेंबर महिन्याचा लोकशाहीदिन दि.०१ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज निवेदनाच्या दोन प्रतींमध्ये दि.१७ डिसेंबर २०२५ पर्यंत मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

अर्जासह निवेदन सादर करतांना नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने लोकशाही दिनात निवेदन सादर करण्यापूर्वी संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे.

## संपादकीय

### कर्जमाफी होईल, पण...

बच्चू कडू, राजू शेट्टी आणि अजित नवले हे शेतकरी नेते आणि शेतकरी संघटनांनी केलेल्या चक्काजाम आंदोलनामुळे येत्या ३० जूनपर्यंत राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांना करावी लागली. मुळात लाडकी बहीण योजना आणि शेतकरी कर्जमाफीच्या आश्वासनांच्या जोरावरच महायुतीला राज्यात सत्तेचा सोपान गाठता आला. योगायोगाने याच महिन्यात सरकारची वर्षपूर्ती होणार असल्याने बारा महिन्यांच्या कारभाराचे प्रगतिपुस्तक सत्ताधाऱ्यांना मांडावे लागेलच. निवडणूक काळातील शेतकरी वीजबिल माफीसह आणखी बरीच आश्वासने प्रलंबित असली; तरी वरील दोन्ही प्रमुख घोषणांची पूर्तता केल्याचा दावा करून महायुती सरकार स्वत:ची पाठ नक्कीच थोपटून घेईल. 'सबका साथ, सबका विकास' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पपूर्तीचाच हा भाग असल्याचे पुन्हा पुन्हा सांगितले जाईल. महिला व दीनदुबळ्या वर्गासह शेतकऱ्यांसाठी आपले सरकारच मसीहा असल्याचे दाखवून देण्याचेही प्रयत्न होतील.

अलीकडे राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांच्या अंगात श्रेयवादाचा गुण पुरता भिनल्याने त्याबद्दल हरकत असण्याचेही कारण नाही. परंतु, 'लाडक्या' बहिणींना ओवाळणी देतादेता आर्थिक बेजार झालेल्या सरकारला या नव्या योजनेसाठी साधारण पंचवीस ते तीस हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार, एवढे नक्की! अलीकडे कर्जमाफी योजनांशी केंद्राचा संबंध उरला नसल्याने आधीच रित्या झालेल्या तिजोरीत या रकमेची जुळवाजुळव करण्याचे आव्हान राज्याला स्वबळावरच पेलावे लागेल. गत वर्षभराचा अनुभव लक्षात घेता विकासकामे वा अन्य घटकांच्या पैशांत काटछाट करून ही आर्थिक जुळवणी केली जाईल. परंतु, नव्या कर्जमाफीने शेतकरी अल्पकाळ सुखावणार असले तरी बँकांवर मात्र विपरीत परिणाम होण्याचा धोका उद्भवतो. खासकरून आर्थिक संकटात सापडलेल्या, उर्जितावस्थेसाठी धडपडणाऱ्या सहकारी बँकांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते, हे सांगण्यासाठी आर्थिक जाणकार वा तज्ज्ञाची अजिबात आवश्यकता नाही.

आजमितीस राज्यातील अशा आठ-दहा जिल्हा बँकांच्या अडचणी अधिक वाढणार आहेत. एकट्या नाशिक जिल्ह्याचा विचार केल्यास मागील सात-आठ वर्षांपासून दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे आता काय होणार, हा प्रश्न पुन्हा उपस्थित होतो आहे. वसुली मोहीमच थंडावणार असल्याने 'दुष्काळात तेरावा महिना' अशी तिची अवस्था होणार आहे. मरणासन्न अवस्थेतील या संस्थेच्या बहुचर्चित सामोपचार योजनेला (ओटीएस-वन टाइम सेटलमेंट) आज बरोबर तीन महिने पूर्ण होत आहेत. सुमारे ३५ हजार सभासद योजनेसाठी पात्र ठरले खरे; परंतु अवघ्या तीन हजार सभासदांनी 'हो-नाही' करीत ३६ कोटी रुपयांच्या थकबाकीचा भरणा केला. ही रक्कम थकबाकीच्या डोंगराच्या तुलनेत अत्यल्प व असमाधानकारक असली तरी बँकेला मात्र 'बुडत्याला काडीचा आधार' याप्रमाणे सहाय्यभूत ठरणार होती. काही महिन्यांपूर्वी नागपूर जिल्हा बँकेचे पुनरुज्जीवन करून बँकिंग क्षेत्रात आदर्श निर्माण करणारे अर्थतज्ज्ञ विद्याधर अनास्कर प्रशासक प्रमुख म्हणून लाभले. त्यांचे आटोकाट प्रयत्न व जोडीला 'ओटीएस'च्या माध्यमातून जोमाने वसुली होऊन नाशिक जिल्हा बँक पुन्हा सक्षम होऊ शकेल, असा आशावाद व्यक्त होत होता. मुद्दल व व्याज मिळून सुमारे तेवीसशे कोटी रुपयांची सभासदांची थकबाकी असल्याने शासनाकडे ६७२ कोटींच्या भागभांडवलाची मागणीही प्रशासक मंडळ व सभासदांनीही मधल्या काळात केली.शिखर बँकेच्या माध्यमातून ही आर्थिक मदत मिळेल तेव्हा मिळेल तोवर 'ओटीएस'च्या माध्यमातून मार्चपर्यंत किमान दीडएकशे कोटींची वसुली होण्याची अपेक्षा होती. परंतु, आता कर्जमाफीची घोषणा झाल्याने प्रशासकांच्या प्रयत्नांवर पाणी फेरून ती फोल ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

कर्ज माफ होण्याच्या अपेक्षेने छोट्या-मोठ्या थकीत कर्जदारांकडून या वित्तीय संस्थेला ठेंगा दाखवला जाऊ शकतो. त्यात चालू वर्षात बँकेने ३७१ कोटींचे कर्जवाटप केलेले आहे. ही मंडळीसुद्धा कर्ज भरण्याची शक्यता नाही. त्यामुळे पुढील वर्षात हे कर्ज वितरणही अशक्यप्राय होईल.

# आग अति उत्साहाची...



दीपावली संपली तरी त्यासोबत काही कडू आठवणी मात्र कायम राहिल्या. या दिवाळीमध्ये फटाक्यांमुळे घरात आग लागून अनेकांच्या आयुष्यात कायमचा अंधार पसरला. मुंबईमधील गोराई असो की बोरिवली, मालाड अथवा थेट ठाणे, वाशी, कल्याण, पुणे आणि नागपूर तसेच राज्यातील अनेक गांव शहरात सुद्धा छोट्या मोठ्या घटना घडल्या. मुळात या आगी लागण्याची कारण मीमांसा होणे आवश्यक ठरते. फटाक्यांचा अमर्याद वापर व ते फोडताना केलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे अनेक ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत. दिवाळीमध्ये फटाके जपून वापरण्याचा वारंवार सल्ला दिला जातो. रॉकेटसारखे फटाके उघड्या मैदानावर लोक वस्तीहून दूर वाजवण्याबद्दल अनेकदा सूचना दिल्या जातात. अशाच निष्काळजीपणाने बोरिवली येथे दुर्घटना घडली. बोरिवली पश्चिम येथील शिंपोली रोड परिसरात एक रॉकेट आरशांच्या दुकानावर पडले आणि मोठी आग लागली. या आगीत तीन मोठी दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली, तर एका दुचाकीचेही नुकसान झाले. पुण्यातसुद्धा फटाक्यांची आतषबाजी सुरू असताना पुण्यात तब्बल ४२ ठिकाणी आग लागल्याच्या घटना नोंदल्या गेल्या. राज्यातील अनेक शहरात फटाक्यांची विक्री करणारी अनधिकृत दुकानेसुद्धा नागरी वस्तीमध्ये धोकादायक पद्धतीने उभारण्यात आली होती. नेहमीप्रमाणे प्रशासनाने याकडे कानाडोळा केला होता. भरवस्तीत असलेल्या या अनधिकृत स्टॉलने अनेक छोट्या-मोठ्या घटना घडल्या पण सुदैवाने जीवितहानी झाली नसली तरी असे स्टॉल असू नये यासाठी जागरूक राहणे आवश्यक ठरते. अलीकडच्या काळात अशा सण-उत्सवांना केवळ दिखाऊ व चंगळवादाचे स्वरूप आल्याचे दिसते. प्रत्येक सण उत्सव, समारंभहा निसर्गाला ओरबाडून, हानी पोहचून साजरा केला जातो, असेही ठळकपणे जाणवते. लग्न समारंभ, वाढदिवस, क्रिकेटचे सामने, नववर्षाचे स्वागत, राजकीय नेत्यांचे स्वागत, दिवाळी अशा विविध प्रसंगी प्रचंड फटाक्यांची आतषबाजी होताना आपण पाहतो. ज्या ज्या सण उत्सवामध्ये फटाक्यांची प्रचंड आतषबाजी केली जाते, त्या त्या ठिकाणी सर्वांनी सुज्ञपणा दाखवला, शहाणपण दाखवले तर त्या त्या ठिकाणाहून फटक्यांना हळूहळू आपला गाशा गुंडाळावा लागेल, हे नक्की! पण अजून तरी हे स्वप्नवतच वाटते. कारण फटाके उडवण्याची उत्सुकता जशी लहान मुलांमध्ये दिसून येते, त्याहून अधिक ती युवकांपासून तर प्रौढ व्यक्तीमध्ये दिसून येते. त्यामुळे आगीच्या घटनांमध्ये मोठी वाढ दरवर्षी होत असल्याचे एका अहवालामध्ये निष्पन्न झाले आहे. एकीकडे दरवर्षी कुठेतरी फटाक्यांच्या कारखान्याला आग लागल्याच्या बातम्या येतात. त्यामध्ये अनेक कामगारांचा होरपळून मृत्यू झाल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. फटाके विविध प्रकारचे आणि आकाराचे असतात. विशेषतः मध्यम किंवा लहान आकाराच्या फटाक्यांना जास्त पसंती दिली जाते. त्यामुळे त्यांची मागणी जास्त असते. अशा लहान फटाक्यांमध्ये दारू भरण्यासाठी मोठ्या व्यक्तीपेक्षा लहान मुलांना प्राधान्य दिले जाते. कारण त्यांची बोटं लहान असतात आणि बोटाने फटाक्याच्या आत दारू भरणे सोपे जाते. त्यामुळे फटाक्यांच्या कारखान्यात मोठ्या संख्येने बालमजूर असतात. अर्थातच त्यांना अल्पमजुरी दिली जाते. शासकीय पातळीवर याकडे डोळे झाक केली जाते. पोटाची आग शमवण्यासाठी पालकही डोळ्यावर कातडे ओढून आपल्या लहान वयातील मुलांना या कारखान्यात कामाला जुंपतात. परिणामी अशा बालकांचे शिक्षण खंडित होते. शिक्षण नसल्यामुळे आणि विशेष कोणत्याही कामाचे कौशल्य प्राप्त न झाल्याने अशी मुले नंतर आयुष्यात समाजातील बेकारीचे बळी ठरतात. फटाक्यांची आतषबाजी शक्यतो रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात केली जाते. अनेक लहान मोठ्या शहरांमध्ये दिवाळीच्या चार-पाच दिवसांमध्ये दोन कोटी रुपये ते दहा कोटी रुपयांहून अधिक किमतीचे फटाके उडवले जातात, असा अंदाज आहे. म्हणजेच देशात एका दिवाळी सणात फटाक्यांपाई हजारो कोटी रुपये अनाठायी खर्च होतात. कोणत्याही प्रकारचा फायदा नसणाऱ्या, उलट नुकसानच ठरणाऱ्या अशा अविवेकी वर्तनापायी व्यक्ती, कुटुंब व समाज हे मोठ्या प्रमाणात शारीरिक आणि आर्थिक बाबींनी कमकुवत होतात असे म्हणावे लागेल. फटाक्यांची प्रचंड आतषबाजी करणे म्हणजे खरे तर पैसा जाळणे, असंच म्हणावं लागेल, फटाक्यातून तो धूर निघतो तो पैशाचा धूर असतो, उत्क्रांतीच्या टप्प्यावर विकसित झालेल्या माणसाला अजूनही हे का समजत नाही, असा मोठा प्रश्न पडतो. कारण फटाके उडवल्याने कोणतीही फायद्याची गोष्ट घडत नाही. उलट पैसा आणि पर्यावरण बांची हानीच होते. फटाके उडवल्याने मोठ्या प्रमाणात ध्वनी आणि वायूचे प्रदूषण होते, हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो आणि कानांनी ऐकतो. नैसर्गिक मर्यादपलीकडील ध्वनीच्या आवाजाने माणसाच्या कानांना इजा होते, कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. मयदिपलीकडे धूराने, वायुने मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषण होऊन डोळ्यासह फुप्फुसाला इजा होते. दमा, खोकला, डोकेदुखी हे आजार उद्भवतात, उचल खातात, बळावू शकतात. परिसर दणाणून सोडणारा आवाज आणि तीव्र प्रकाश यामुळे प्राणी, पक्षी भयभीत होतात, सैरावैरा पळू लागतात. त्यामुळे त्यांना अपघात होतात आणि मोठ्या प्रमाणात इजाही होते. वृद्ध आणि आजारी व्यक्ती, परीक्षार्थी, लहान बालके यांनाही फटाक्यांचा अतोनात त्रास होतो. दीपावली कालावधीत रात्री १० वाजल्यानंतर अनेक शहरात मोठ्या प्रमाणात फटाके फोडण्यात आले. त्याच्या परिणामी हवेचा गुणवत्ता दर्जा आणखीनच खराब होण्यावर झाला. फटाक्यांमुळे विविध प्रकारची रसायने वातावरणात मिसळली गेली असून, त्याचा प्रभाव अनेक दिवस टिकून राहतो. याबाबतच्या संशोधनात असे निदर्शनास आले आहे की, वातावरणातील प्रदूषणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवर होत असतो. त्यात पशू-पक्षांसह वनस्पतींवर वातावरणात असलेल्या रसायनांचा प्रभाव दिसून येतो. रसायनांच्या संपर्कात आल्यामुळे अनेक पशु पक्षी नामशेष झाले असून काही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्याची भयावहता प्रचंड आहे. यंदाच्या दिवाळीत आधी वायू प्रदूषणाने उच्चांक गाठला असताना, त्यात दिवाळीतील फटाक्यांच्या अतिरेकाची भर पडू नये यासाठी नागरिकांनी सजग राहायला हवे होते. सण-उत्सव साजरे करताना नियमात व्हावे, आतिषबाजी जरूर करावी. मात्र पर्यावरणाला हानी होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. मात्र आजवरची एकूण परिस्थिती पाहिली तर तसे होताना दिसत नाही, ही एक प्रकारे पर्यावरणाची फार मोठी हानी आहे, असे मानायला हरकत नाही. वास्तविक कोणताही सण, उत्सव, समारंभहा सर्वांना निखळ आनंद देणारा, समाजात एकोपा व स्नेह वाढविणारा, ताण-तणावातून माणसांना बऱ्यापैकी मुक्त करणारा, वैरभाव संपवणारा, माणसांच्या मनात, शरीरात ऊर्जा भरवणारा, निसर्गाची जपणूक व संवर्धन करणारा, नवनवीन गोष्टी शिकण्याची संधी देणारा प्रसंग किंवा घटना असते, तसाच तो असायला हवा, अशी अपेक्षा आहे. फटाक्यांच्या या वातीने अनेकांच्या आयुष्याची वाताहत झाली असून त्याला वेळीच आवर घालणे ही काळाची गरज आहे. फटाकांमुळे ज्यांची घरे जळाली आहेत, जे जखमी झाले आहेत, त्यांचे नक्कीच मोठे नुकसान झाले आहे. कदाचित हे नुकसान भरून निघेल ही परंतु सणाच्या उत्साहात त्यांच्यावर संकटाचा घाला पडला आहे. तो त्यांना प्रत्येक दिवाळीच्या वेळी त्यांच्यावरील प्रसंगाची आठवण करून देणारा आहे. त्यामुळे प्रत्येक क्षण उत्साहाने, परंपरेने साजरे झाले पाहिजे. परंतु अतिउत्सामुळे कोणाचे नुकसान होणार नाही याची काळजी देखील घेणे गरजेचे आहे.

**– श्री. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो. बेलेवाडी (मासा)**
**कागल-कोल्हापूर.**

## नावडे...

अंतस्थ छुपी अपेक्षा
कौतुक कुणा नावडे
विरळा एखाद कुणी
ज्यांस प्रसिद्धीवावडे

मी प्रसिद्धीपरान्मुख
म्हणू द्यावे हवे तेवढे
करावे वाटते कौतुक
माझे अस्माना एवढे

हरेक पारितोषिकाने
वळावे आमच्या कडे
मी सर्व गुणांने संपन्न
रे बाकीचेपडे तोकडे

सरळ मार्गी आम्हीचं
कोण करणारवाकडे
पसरवा सुगंधासमान
किर्ती जिकडे तिकडे

माना वाकवून संपूर्ण
माझ्यापुढे हात जोडे
मज विरोधातबोलता
मारावे त्यालाचं जोडे

बसे मनसिंहासनावर
आग्रह तुमचा न मोडे
करालकिती उदोउदो
कौतुकआवरावे थोडे

स्तुती सुमने उधळता
मणभर अहम् रे चढे
मी माझ्यावरभाळतो
स्वतावरचं प्रेमहीजडे

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

## काय रे निसर्गा

पावसाळा संपून गेला तरी पाऊस
पाडू राहिलास,
काय रे निसर्गा..
तु पण या स्वार्थी जगासारखा वागू
राहिलास...!!

तुला हानी पोहोचवणारे एक तर
फायदा घेणारे अनेक,
नुकसान मात्र शेतकऱ्यांचे करून
गेलास,
काय रे निसर्गा...
तु पण या स्वार्थी जगासारखा वागू
राहिलास...!!

तुझ्यावर वर्षांनुवर्ष विश्वास तो ठेवत
आला,
आज मात्र तु त्यांचा केसाने गळा
कापलास,
काय रे निसर्गा...
तु पण या स्वार्थी जगासारखा वागू
राहिलास...!!

बारा महिन्यांचे कष्ट तुझ्या विश्वासावर
तुझ्या झोळीत ओतले,
पण तु मात्र स्वतः हुन तुझी झोळी
फाडून निघून गेलास...
तु पण या स्वार्थी जगासारखा वागू
राहिलास...!!

आता तरी थांब बस्स कर,
शेवटी शेतकऱ्याच्या आत्महत्तेचे
कारण बनुन राहशील ,
मला सांग... शेतकऱ्यांशिवाय या
स्वार्थी जगात तु तरी किती दिवस
टिकून राहाशील...!!

**– माया मोंडुळा**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# गुरू नानक देव !



आज कार्तिक पौर्णिमा, आज शीख समुदायाचे लोक श्री गुरू नानक देवजी यांचा जन्मोत्सव साजरा करतात. वास्तविक श्री गुरु नानक देवजी यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी झाला मात्र शीख धर्माचे अनुयायी त्यांचा जन्मोत्सव कार्तिक पौर्णिमेलाच साजरा करतात. गुरू नानक देवजी हे शीख धर्माचे संस्थापक व पहिले गुरु होते.

गुरू नानक देवजी यांचा जन्म पाकिस्तानातील लाहोर जवळील तलवंडी येथे एका हिंदू कुटुंबात झाला. आजही या गावाला नानकना साहिब असे म्हणतात. गुरू नानक यांचा जन्मोत्सव प्रकाश पर्व म्हणूनही साजरा केला जातो. गुरू नानक देव लहानपापासूनच धार्मिक वृत्तीचे होते मात्र कर्मकांड आणि बुरसटलेले विचार त्यांना मान्य नव्हते म्हणूनच त्यांनी मौजीबंधनाच्यावेळीच जानवे घालण्यास नकार दिला होता होता. हिंदू धर्मातील कर्मकांड, बुरसटलेले विचार, अनिष्ट चालीरीती, विषमता, जातीभेद, स्त्रियांना दिली जाणारी हिन वागणूक त्यांना मान्य नव्हती म्हणूनच ज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी शीख धर्माची स्थापना केली. शीख धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी जगभर यात्रा काढली. या दरम्यान त्यांनी जगभरातील अनेक धार्मिक स्थळांना देखील भेटी दिल्या. त्यांनी त्या काळात केवळ भारतातीलच धार्मिक स्थळांना नव्हे तर इराक मधील बगदाद आणि सौदी अरेबियातील मक्का मदिना या धार्मिक स्थळांनाही भेटी दिल्या.

या दरम्यान त्यांनी शीख धर्माच्या तत्वांचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्यांमध्ये देव आणि धर्माबाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी हिंदू मुस्लिम एकतेचा संदेशही दिला. त्यांनी स्थापन केलेला शीख धर्म उदात्त, समतेच्या शिकवणुकीमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात रुजला. आज शीख धर्माचे अनुयायी केवळ आशिया खंडातच नाही तर युरोप आणि अमेरिका खंडातही आहे. जगातील प्रमुख धर्मा पैकी एक धर्म म्हणून शीख धर्म ओळखला जातो. गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य आणि शाश्वत मूल्यांचे मूळ होते म्हणूनच जात धर्म यापलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे, माणूस म्हणून एकत्र राहावे अशी त्यांची इच्छा होती. सर्व माणसे ही एकाच आईची लेकरे असून त्यांच्यात कोणीही उच्च नीच नाही असे ते मानत.

जातीपाती मधील धर्मा धर्मामधील भेदभाव तर मान्य नव्हता. कोणीही हिंदू नाही, कोणीही मुसलमान नाही सर्व जण मानव आहोत असा नारा त्यांनी दिला. त्यांनी एकता, श्रद्धा आणि प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारक विचारांचे होते. त्यांच्या विचारांमुळेच शीख धर्म साता समुद्रापार गेला. ७ सप्टेंबर १५३९ रोजी श्री गुरु नानक देवजी यांचे महानिर्वाण झाले. गुरू नानक देवजी यांना त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नागपूर विभागात पदवीधर मतदार नोंदणी गुरुवार पर्यंत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील नागपूर पदवीधर मतदार नोंदणी मुदत येत्या गुरुवार, दिनांक ०६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आहे. पात्र पदवीधर मतदारांनी आपली मतदार म्हणून नोंदणी विहीत नमुन्यात करून घ्यावी, असे आवाहन बल्लारपूर तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी रेणुका कोकाटे यांनी केले आहे. भारत निवडणूक आयोग यांच्या वतीने नागपूर विभागात पदवीधर मतदारांची नोंदणी अधिनियम १९६० चे नियम ३१ (४) अन्वये विधानपरिषद निवडणूक पारदर्शक पार पाडण्यासाठी पदवीधर मतदारांची नोंदणी प्रक्रिया सुरु आहे. याची माहिती निवडणूक आयोग संकेत स्थळावर उपलब्ध आहे. पदवीधर धारक मतदारांनी नमुना १८ मध्ये माहिती भरुन नागपूर विभागात पदवीधर मतदार म्हणून नोंदणी येत्या गुरुवार पर्यंत करून घ्यावी. आपले मतदार म्हणून नोंदणी झाल्याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन बल्लारपूर येथील तहसिलदार रेणुका कोकाटे व नायब तहसिलदार महेंद्र फुलझेले यांनी केले आहे

## गौरविलेल्या सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्यांची उभारणी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, मुंबई :** राज्यातील अंगणवाड्यांना आधुनिक, सशक्त आणि पारदर्शक बनवून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्मार्ट अंगणवाडी योजनेअंतर्गत राज्यभरात व्यापक कार्यवाही सुरू आहे. या योजनेअंतर्गत उत्कृष्ट सरपंच म्हणून गौरविण्यात आलेल्या १३ सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्या उभारण्यात आल्या असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, १३ गावांतील अंगणवाड्यांना स्मार्ट स्वरूप देण्यात आले आहे. या केंद्रांमध्ये अत्याधुनिक सुविधा, डिजीटल शिक्षण साधने, तसेच बालक आणि मातांसाठी आरोग्य व पोषण जनजागृती उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे काम पूर्ण झाल्याचा मनस्वी आनंद आहे. एकात्मिक बालविकास सेवा (आयसीडीएस) योजनेअंतर्गत अंगणवाड्यांमध्ये बालकांना आरोग्य, पोषण आणि पूर्व-प्राथमिक शिक्षण या तिन्ही क्षेत्रांत मूलभूत सेवा पुरविल्या जातात. या अंगणवाड्यांना स्मार्ट बनविण्याच्या उपक्रमामुळे त्यांच्या पायाभूत सोयी-सुविधांमध्ये सुधारणा झाली असून, शिक्षण आणि पोषण सेवा अधिक प्रभावी पद्धतीने दिल्या जात आहेत. महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी म्हणाल्या की, स्मार्ट अंगणवाडी हे केवळ इमारतीचे नव्हे, तर बालक आणि मातांच्या उज्ज्वल भविष्याचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि संवेदनशील दृष्टिकोन यांचा संगम घडवून अंगणवाड्यांना आदर्श केंद्र बनवण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून, राज्यातील सर्व अंगणवाड्यांना टप्प्याटप्प्याने स्मार्ट स्वरूप देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचेही तटकरे यांनी सांगितले.

## विश्वासाचा प्रत्यय विकासाच्या माध्यमातून देणार - आमदार दाते

### यादववाडीत ४० लाखांहून अधिक विकासकामांचा शुभारंभ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** विधानसभा निवडणुकीच्या काळात अगदी प्रतिकूल परिस्थितीतही तालुक्यातील सर्वसामान्य जनता माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली. त्या विश्वासाचे उत्तर विकासाच्या माध्यमातून देणे हे माझे कर्तव्य आहे. गेल्या चाळीस वर्षांच्या तालुक्यातील राजकारणाचा अनुभव माझ्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी यादववाडी येथे केले.

यादववाडी परिसरातील एकूण ४० लाख रुपयांहून अधिक निधीच्या विकासकामांचे भूमिपूजन आमदार दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या कामांमध्ये १२ लाख रुपयांचा साठा बंधारा, ९ लाख रुपयांची स्मशानभूमी सुधारणा, तसेच २२ लाख रुपयांचा यादववाडी ते अलभरवाडी रस्ता बांधकाम यांचा समावेश आहे. या तिन्ही कामांमुळे स्थानिक पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावणार असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनमानात सुधारणा होणार आहे. या प्रसंगी भाजपाचे मंडलाध्यक्ष राहुल शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्षा सुषमाताई रावडे, माजी सभापती गणेश शेळके, नितीन अडसुळ, दत्ता नाना पवार, राजू उबाळे, लहु भालेकर,अरविंद यादव, महेश वाळके,सागर यादव, आकाश यादव, अजित ठोंबरे, प्रवीण यादव आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमप्रसंगी यादववाडी आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भुमिपूजन सोहळ्याच्या निमित्ताने आमदार दाते यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत गावाच्या गरजेनुसार विकास कामे प्रस्तावित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, प्रत्येक गावाच्या प्राधान्यक्रमानुसार कामे राबविण्यात येतील. जनता केंद्रस्थानी ठेवूनच विकासाची वाटचाल करायची आहे.जनतेच्या विश्वासाचा प्रत्यय देत, पारनेर - नगर मतदारसंघात विकासाचा झपाटा कायम राहील, असा विश्वास आमदार दाते यांनी व्यक्त केला.

## मिरा भाईंदर महानगरपालिकेने RRR वाचनालयाचे उद्घाट्न आयुक्त्यांच्या हस्ते केले




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०४, मिरा भाईंदर :** मिरा भाईंदर महानगरपालिकेने RRR वाचनालयाची दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५२०२५ रोजी दुपारी २ वा. उदघाट्न करून सुरुवात केली आहे. ज्याचा अर्थ रीड, रिटर्न आणि रिपीट असा आहे. या योजनेतर्गत, लोक आपली जुनी पुस्तके दान करू शकतात आणि ती पुस्तके वाचनालयात वाचण्यासाठी उपलब्ध असतील. ही योजना महापालिकेच्या विविध वाचनालयांमध्ये राबवली जाणार आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना शासकीय परीक्षांच्या तयारीसाठी उपयोगी ठरेल. या वाचनालयाच्या उद्घाटन प्रसंगी, महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सांगितले की, ही योजना पूर्णपणे सामाजिक संस्थेच्या सहकार्याने सुरू केली गेली आहे आणि महापालिकेचा कोणताही पैसा यात खर्च झालेला नाही. या वाचनालयातून विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी एमपीएससी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या एका विद्यार्थ्याचा सत्कार करण्यात आला, ज्याने महापालिकेच्या वाचनालयात अभ्यास करून यश मिळवले होते.

# 'कॅन्सर हॉस्पिटल'चा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत २२ डिसेंबरला चंद्रपुरात

## सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या हस्ते होणार लोकार्पण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** राज्याच्या अर्थमंत्री पदावर असताना चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासाला वेगळा आयाम देणारे आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातुन साकारलेल्या चंद्रपूर कॅन्सर हॉस्पिटलचे लोकार्पण दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती या लोकार्पण सोहळ्याला लाभणार आहे.

अर्थमंत्री, वनमंत्री, सांस्कृतिक कार्य मंत्री तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून आ. मुनगंटीवार यांनी कार्यशील दृष्टिकोन आणि विकासनिष्ठ सेवाव्रत यांच्या बळावर चंद्रपूर जिल्ह्यात मोठया प्रमाणावर विकासकामे पूर्णत्वास आणली. विकास हा धर्म आणि समाजहित हे ध्येय या धोरणातून त्यांनी जिल्ह्याच्या विकासाचा मार्ग प्रशस्त केला. या वाटचालीत चंद्रपूरच्या जनतेसाठी एक महत्त्वपूर्ण लोककल्याणकारी प्रकल्प प्रत्यक्षात उतरत आहे, तो म्हणजे २८० कोटी रु. किंमतीचे टाटा ट्रस्ट च्या सहकार्याने साकारलेले चंद्रपूर कॅन्सर रुग्णालय. २०१४ मध्ये अर्थमंत्री झाल्या पासून आ. मुनगंटीवार यांनी या विषयाचा जोरदार पाठपुरावा केला.

दिनांक १७ एप्रिल २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत चंद्रपूर येथे अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालय उभारण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला. दि. २६ जून २०१८ रोजी याबाबत शासन निर्णय निर्गमित झाला. जिल्हा खनिज विकास प्रतिष्ठान, राज्य शासन आणि टाटा ट्रस्ट यांच्या सहकार्याने २८० कोटी रुपये खर्चातून उभारण्यात आलेले अत्याधुनिक कॅन्सर हॉस्पिटल आज पूर्णत्वास आले आहे. पूर्वविदर्भातील आदिवासी, ग्रामीण आणि सर्वसामान्य घटकांसाठी हे केंद्र



खऱ्या अर्थाने नवजीवनाचा आधार आणि आशेचा किरण ठरणार आहे. या कॅन्सर हॉस्पिटलची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. तळमजला + ४ मजले, अंदाजे १,००,०००+ चौ.फुट क्षेत्रफळ, १४० बेड क्षमतेचे अत्याधुनिक उपचार केंद्र, कॅन्सर निदान व उपचारासाठी सुसज्ज तंत्रसामग्री : यात सीटी सिम्युलेटर (सीटी-एस), मॅमोग्राफी, ३डी/४डी अल्ट्रासाऊंड, ३डी/४डी आणि इलास्टोग्राफीसह उसग, सीटी - १६ स्लाइस आणि स्पेक्ट,२ रेषीय प्रवेगक, ब्रेकीथेरपी, डिजिटल एक्स-रे, विशेष उपचार विभाग : यात केमोथेरपी, सर्जिकल ऑन्कोलॉजी, आधुनिक प्रयोगशाळा सूक्ष्मजीवशास्त्र, रक्तविज्ञान, हिस्टोपॅथोलॉजी आदींचा समावेश आहे.या सर्व बाबींमुळे हे रुग्णालय पूर्वविदर्भातील सर्वात सक्षम, सुसज्ज आणि पूर्णत्वाने कॅन्सर केअर देणारे केंद्र ठरणार आहे.

या प्रकल्पाबाबत आ. सुधीर मुनगंटीवार यांची टाटा समूहाचे प्रमुख स्व. रतन टाटा यांच्याशी चर्चा होत असताना त्यांनी या रुग्णालयाचे लोकार्पण सर संघचालक मोहनजी भागवत यांच्या हस्ते व्हावे, अशी इच्छा व्यक्त केली होती. आ. मुनगंटीवार यांनी मोहनजी भागवत यांना प्रत्यक्ष भेटून विनंती केली असता त्यांनी २२ डिसेंबर रोजी या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहण्यास दर्शविली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे.

# शनी चौथर्यावरुन सर्वांना मोफत दर्शन व्यवस्था करा - तृप्ती देसाई यांचा इशारा




**सर्वसामान्य भाविकांना पावती**

सर्वसामान्य भाविकांना चौथर्यावरून दर्शन घेण्यासाठी ५०० रूपयाची पावती फाडावी लागते. परंतु मंत्री, आमदार यांच्यासह राजकीय नेते तसेच राज्यातील अनेक अधिकाऱ्यांनाही मोफत सोडले जाते. याबाबत शनी भक्तांमध्ये मोठी नाराजी असून नवीन समितीने सर्वांसाठी चौथरा खुला करावा अशी मागणी जोर धरत आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहिल्यानगर :** शनि शिंगणापूर येथे भाविकांना चौथर्यावर जाऊन दर्शनासाठी घेतले जाणारे ५०० रुपयांचे शुल्क तात्काळ बंद करावे. तेथे सर्वांना समान आणि मोफत दर्शनाची व्यवस्था करावी, अशी मागणी भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी केली आहे. अन्यथा यासाठी पुन्हा एकदा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

देसाई यांनी महिलांना चौथर्यावरील दर्शन खुले करण्यासाठी आंदोलन केले होते त्यामुळे विश्वस्त मंडळाने यावर तोडगा काढत ज्या महिलांना चौथर्यावर जायचे असेल त्या सर्वांना चौथरा खुला केला पण येथील रूढी व परंपरेला जपत परिसरातील महिला अजुनही चौथर्यावर जाणे टाळतात. काही दिवसांपूर्वी देवस्थानच्या विश्वस्त मंडळाने तिरूपती बालाजी व शिर्डी देवस्थानच्या धर्तीवर भाविकांच्या झटपट दर्शनासाठी सशुल्क दर्शनाची सोय केली.

यामुळे देवस्थानच्या दानातही मोठी वाढ झाली आहे. नुकतेच सरकारने विश्वस्त मंडळ बरखास्त करून हे देवस्थान ताब्यात घेतले असून येथे जिल्हाधिकारी यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे.

तृप्ती देसाई यांनी शनि मुर्तीचे चौथर्यावरील दर्शन ५०० रुपयांचा पास बंद करून सर्वांसाठी हे दर्शन खुले करण्याची मागणी केली आहे. त्यातच देवस्थानच्या मागील विश्वस्त मंडळाने सरकारच्या विरोधात विश्वस्त बरखास्तच्या विरोधात न्यायालयात अपील केले आहे. न्यायालयाने १० नोव्हेंबर ही तारीख दिलेली असल्याने त्यावेळी काय निर्णय लागतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# परराज्यातील मद्य वाहतूक प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई

## दोन आरोपी अटक, १ कोटी ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०४, डोंबिवली (ठाणे) :** राज्य उत्पादन शुल्क, डोंबिवली विभाग, ठाणे यांनी परराज्यातील भारतीय बनावटीच्या विदेशी मद्य (गोवा राज्यात निर्मित) वाहतुकीवर धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात मद्य जप्त केले आहे.

मंगळवार, दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी मिळालेल्या खात्रीलायक गुप्त माहितीनुसार, गोवा राज्यातून मोठ्या प्रमाणात विदेशी मद्याची बेकायदेशीर वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाल्याने पनवेल-मुंब्रा रोडवरील एक्ससीएमजी प्रा. लि. कंपनीसमोर, उत्तरशीव, ता.जि. ठाणे या ठिकाणी सकाळी सुमारे ९.३० वाजता गस्त घालत असताना आयशर कंपनीचा चॉकलेटी रंगाचा सहाचाकी टेम्पो (क्रमांक चक-२०-ऋछ-६४५०) संशयास्पद दिसला. वाहनाची तपासणी केल्यावर त्यामध्ये गोवा राज्यात निर्मित भा.ब. विदेशी मद्याचे बॉक्स आढळले.या प्रकरणी दारूबंदी गुन्हा रजि. क्र. ३३६/२०२५, दिनांक ०४/११/२०२५ नोंदवण्यात आला आहे.

कारवाई दरम्यान एकूण १००० बॉक्स मद्य, किंमत रु. १,०५,६०,०००/-, तसेच ट्रकसह एकूण रु. १,३१,५२,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये -१) मोहम्मद समशाद सलमानी (वाहनचालक)२) देवेंद्र खुमाराम मघवाल यांचा समावेश आहे.

ही कारवाई डॉ. राजेश देशमुख (आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई), प्रसाद सुर्वे (सहआयुक्त, अंमलबजावणी व दक्षता), प्रदीप पवार (विभागीय उपआयुक्त, कोकण विभाग, ठाणे), प्रविण तांबे (अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे), वैद्य (उपअधीक्षक, ठाणे), पोकळे (उपअधीक्षक, नवी मुंबई) व ए.डी. देशमुख (उपअधीक्षक, कल्याण) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत निरीक्षक डी.बी. काळेल, दुय्यम निरीक्षक पी.यू. निकाळजे, ए.एस. वडक्ते, अ.गो. सराफ, सहाय्यक दुय्यम निरीक्षक आर.एन. आडे, तसेच जवान आर.बी. खेमनर, व्हि.एस. अहिरे, ए.जे. नगरकर (महिला जवान) आदींचा सहभाग होता.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास निरीक्षक डी.बी. काळेल हे अधीक्षक प्रविण तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दक्षतेमुळे परराज्यातून बेकायदेशीर मद्य वाहतुकीवर लगाम घालण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली आहे.

# लोक कलावंताना मानधन मिळून देण्यासाठी प्रयत्न करणार - रविंद्र राजदेव

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** सावरगाव येथे बाळासाहेब शिरतार मित्रमंडळाच्या वतीने आयोजित कलावंत सन्मान सोहळा व पुरस्कार वितरण कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे रविंद्रशेठ राजदेव यांनी कलावंतांना शासकीय मानधन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरोदे साहेब होते. कादंबरी पतसंस्थेचे चेअरमन दिनेश आग्रे, सुनील बर्वे, दत्ता जाधव, दत्ता गायकवाड, वसंत जगताप, बाळाशीराम पायमोडे, रामदास साळवे, संतोष शिंदे यांच्यासह महाराष्ट्र राज्य छत्रपती शिवराय कलगी-तुरा संघटनेचे अध्यक्ष शाहीर रामदास गुंड, जागरण-गोंधळ पार्टी, बशीरभाई खामुंडीवाले, इस्माईल भाई, संजय मोरे, पत्रकार गणेश जगदाळे आदी मान्यवर उपस्थित होते. रविंद्र राजदेव म्हणाले, कलावंताला शासनाकडून मानधन तर मिळत नाहीच, पण सन्मानही मिळत नाही. त्याच्या कलेला वाव मिळाला, तर ती कला आणखी जोमाने बहरेल.

मी पुढील काळात कलावंतांना न्याय व मानधन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार. कलावंतांची एकजूट झाली. त्यांचा आवाज मंत्रालयापर्यंत पोहोचला, तर सरकारला झुकावे लागेल. जळगाव, बीड, पुणे, सांगली, कोल्हापूर, जुन्नर, संगमनेर येथून शेकडो कलावंत सहकुटुंब उपस्थित होते. जागरण - गोंधळ, कलगी-तुरा, शाहीरी, ढोल-ताशा अशा विविध



कलाप्रकारांचा अनोखा संगम येथे पहायला मिळाला. बाळासाहेब शिरतार यांचा सन्मान यावेळी बाळासाहेब शिरतार यांची महाराष्ट्र राज्य कलावंत असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

# दिवा शहराला मूलभूत सुविधा मिळवून देणे हेच आमचे प्राधान्य

## मनसेचे शहराध्यक्ष तुषार पाटील यांचे मत



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०४, दिवा (ठाणे) :** दिवा शहराला 'स्मार्ट सिटी'चे स्वप्न न दाखवता, येथील नागरिकांच्या मूलभूत गरजांवर लक्ष केंद्रित करून त्या प्रामाणिकपणे सोडवण्याचा निर्धार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा शहराध्यक्ष तुषार पाटील यांनी व्यक्त केला आहे. मनसेचे नगरसेवक निवडून आल्यास दिवा शहराला शिस्त लावण्याचे आणि पाणी, आरोग्य, कचरा, शिक्षण यांसारख्या समस्यांवर ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. मनसेने दिवा शहराच्या विकासासाठी खालीलप्रमाणे भूमिका मांडली आहे.

**"पायाभूत सुविधा आणि तातडीचे प्रश्न"**

दिवा पूर्व-पश्चिम पूल मागील १० वर्षांत पूल न बांधल्याबद्दल त्यांनी टीका केली. मनसे सत्तेत आल्यास हा पूल तातडीने पूर्ण करून नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा देण्याचे आश्वासन दिले. १० वर्षांपूर्वी बांधलेल्या पुलाच्या 'पिलर्स'चे काम पूर्ण झाल्यावर ऑडिट करण्याची मागणी त्यांनी केली आहे, कारण त्यांच्या मते प्रशासनात नियोजनाचा अभाव आहे.

पाण्याच्या टाक्यांचा प्रश्न शहरात पाण्याच्या टाक्या बांधूनही पाणी सोडले गेले नाही, त्यामुळे हा खर्च फुकट गेला असून यात कमिशनखोरी झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. असे नियोजनशून्य काम यापुढे होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

पाणी समस्या निवारण: पाणी प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी नवीन रस्ते बांधताना रस्त्यांच्या कामासोबतच त्यांच्या खालून पाण्याच्या लाईन टाकून ठेवण्याची उपाययोजना करण्याचे मत त्यांनी मांडले.

**"स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन..."**

कचरा व्यवस्थापन : कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेने ठोस धोरण आखण्याची गरज आहे. सध्या शहरात अस्ताव्यस्त कचरा पडलेला दिसतो, ज्यामुळे अस्वच्छता पसरते. ही अस्वच्छता दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना करून शहर सुंदर आणि स्वच्छ करण्यावर भर राहील.

जुने प्रकल्प आणि ऑडिट : बेतवडे येथे बांधलेल्या जुन्या पाण्याच्या टाक्यांचे ऑडिट करून दोषींवर कारवाई व्हावी अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली. पाणी समस्येपासून जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न मनसे करेल, असे ते म्हणाले.

**"शिक्षण आणि आरोग्य सुविधा : दर्जेदार शिक्षण..."**

पालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे, त्यामुळे या शाळा दर्जेदार करणे आवश्यक आहे. उत्तम इमारती, वर्ग संख्या वाढवणे आणि नव्या शाळा निर्माण करण्यावर भर दिला जाईल. क्रीडा संकुल लहान मुलांना खेळण्यासाठी स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची तयारी तुषार पाटील यांनी दर्शवली.

**"जनतेच्या हिताचे काम..."**

येथील नागरिकांना आम्ही मोठी स्वप्न दाखवणार नाहीत, असे स्पष्ट करत तुषार पाटील म्हणाले की, दिवा शहरातील नागरिकाला जन्मापासून मृत्यूपर्यंत ज्या ज्या समस्या भेडसावतात त्या प्रामाणिकपणे सोडवण्यासाठी आम्ही काम करू.

दिवा शहराच्या हिताचे काम होईल आणि ज्यांच्या चुकीच्या कामांमुळे शहराला फटका बसला आहे, त्यांच्यावर कारवाई करण्यासाठीही मनसे प्रयत्न करेल. पाटील यांनी नागरिकांना आवाहन केले की, नागरिकांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पाठीशी उभे राहिल्यास त्यांना दिवा शहरात बदल दिसेल. दिवा शहरातील नागरिकांना समाधानाने जगता यावे यासाठी मनसे कटिबद्ध असल्याचे त्यांनी शेवटी नमूद केले.

# पालकमंत्र्यांनी राजकीय आकसापोटी धरणांची कामे बंद पाडली

## केरा - मनदुरे विभागातील ग्रामस्थांचा आरोप

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०४, पाटण (सातारा) :** १९९९ ते २००० च्या दरम्यान तत्कालीन जलसंपदा मंत्री अजितदादा पवार व माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या हस्ते निवकने/चिटेघर/बीबी या मध्यम धरण प्रकल्पाचे काम सुरु झाले. सन २०१४ पर्यंत या माध्यम धरण प्रकल्पांची कामे ही ८० टक्केपर्यंत पूर्ण झाली होती. नंतरच्या कालावधी सध्याचे आमदार व जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी राजकीय आकसापोटी प्रशासकीय अडचणी निर्माण करून निवकने/ चिटेघर/बीबी धरणांची कामे बंद पाडली. असल्याचा माहिति या विभागातील ग्रामस्थांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

पत्रकात म्हंटले आहे, गेल्या १० ते ११ वर्षे सध्याचे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई राज्यात राज्य मंत्री व कॅबीनेट मंत्री असताना या धरण प्रकल्पांचे निधी अभावी व प्रशासकीय अडचणी समोर असताना कामे पूर्ण बंद आहेत. त्याबाबत यांनी विधानसभेत, किंवा प्रशासकीय पातळीवर कसल्याही प्रकारचा आवाज उठवला नाही. तर त्यानंतर निवकने /चिटेपर/बीबी या धरणांच्या बुडीत शेत्रातील प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्त शेतकरयांच्या प्रश्नावर कधीही लक्ष घातले नाही किंवा हे प्रश्न मिटवनेसाठी कसलाही प्रकारचा प्रयत्न केला नाही. चार वर्षापूर्वी सध्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी साखरी, ता. पाटण ठिकाणी तिन्ही धरणप्रकल्प शेतकऱ्यांची पाणी परिषद घेतली होती व त्या प्रकल्पग्रस्त व लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या समोर या तिन्ही धरणांची कामे मी पूर्ण करतो व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न मी तात्काळ मिटवून बांधावर पाणी आणतो ही खोटी आश्वासने देऊन आजअखेर या प्रश्नांवर कधीही अवाक्षर न काढणारे पालकमंत्री निवडणुका आल्या की धूळफेकीचा व जनतेची फसवणूकीचा धंदा करत आहेत. निवकणे लघु पाटबंधारे धरणाची मुळ उंची वाढवून व इतर पाणी साठा वाढवून या धरणातून ग्रव्हीटीद्वारे नदी काठच्या दोन्ही बाजूकडून लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतीसाठी व पिण्याच्या पाणी मिळणेसाठी शासन दरबारी विक्रमसिंह पाटणकर यांनी अथक प्रयत्न केले व तशा प्रकारचे काम सुरु केले.

या पालकमंत्री महाशयांनी हे काम प्रशासकीय अडचणी आणून या धरणांची कामे आजअखेर बंद पाडली आहेत. सध्य स्थितीमध्ये निवकणे धरणामध्ये पाणीसाठा नाही. या धरणाचे काम अनेक वर्षे बंद आहे. धरणाची घळभरणी झाली नाही व इतर सर्व कामे बंद आहेत. दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी पालकमंत्र्यांनी केरळ या ठिकाणी १०० मीटर उंचीवर शेतकऱ्यांना पाणी उचलून देणार या कामी कसल्याही प्रकारची प्रशासकीय मान्यता नसताना जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून व पालकमंत्री या कामी स्वताचे अपयश झाकणेसाठी भूलथापा व खोटे आश्वासन देणेसाठी केरळ या ठिकाणी विभागातील लाभ शेत्रातील व बुडीत शेत्रातील शेतकऱ्यांची जाहीर सभा घेऊन ड्रोन सर्वेक्षण कामाचा शुभारंभाचा कार्यक्रम घेतला. हा निव्वळ शेतकऱ्यांचा फसवणुकीचा धंदा चालू केला आहे. पालकमंत्र्याचे मध्ये एवढीच या धरणांच्या कामा बद्दल कळवळा असेल व हिम्मत असेल तर तिन्ही धरणाची अपूर्ण कामे पूर्ण करून दाखवावी व केरा नदीवरती मंजूर असणारी ११ के.व्ही. वेअरची कामे पूर्ण करावी व मगच त्यांनी ड्रोन सर्वे करून उपसा सिंचन करावे योजनेचे खोटे आश्वासन पूर्ण करून दाखवावे.

निवकणे धरणांवर अदाणी उद्योग समूह या धरणाच्या पाण्यावर ग्रीन हायड्रो प्रकल्प सुरु करत आहे व हेच पालकमंत्री ज्या शासनाचे प्रतिनिधीत्व करत आहेत त्यांनीच हा प्रकल्प अदानी कंपनीस विकला आहे. कंपनी या धरणाच्या बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमीन विकत घेत आहे म्हणून आमचे पालकमंत्र्यांना आवाहन आहे कि अदानी कंपनीस हे धरण विकले आहे का? व या धरणांमध्ये साठणाऱ्या पाण्यावर लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचा किती हक्क शाबीत राहणार आहे. नदीपात्रात मुळात हे पाणी नदी पात्रात येणार का? याबाबत पालकमंत्री आज अखेर मुग गिळून का गप्प आहेत? याचा जनतेसमोर जाहीर खुलासा करावा. असेही त्यांनी पत्रकात नमूद केले आहे

या निवेदनावर पाटण दूध संघाचे चेअरमन सुभाषराव पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य बापूराव जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सदस्य जे. डी. जाधव, धडामवाडीचे माजी सरपंच लक्ष्मणराव कदम, मनदुरेचे माजी सरपंच शिवाजीराव पाटणकर, विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन नयनराव पाटणकर, भाजपाचे उत्तर मंडळ उपाध्यक्ष जगदीश जाधव, विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन सुरेश कदम, चेअरमन अप्पासो देसाई, दूध संघाचे संचालक विजय शिंदे, मनदूरे विकास सेवा सोसायटीचे चेअरमन सुरज पाटणकर, माजी चेअरमन जगन्नाथ पवार, माजी उपसरपंच सूर्यकांत गुरव, केरळचे ग्राम पंचायत सदस्य समाधान गुजर, बीबीच कार्यकर्ते मोहनराव जाधव, विकास सेवा संस्थेचे चेअरमन विलास पवार, मेंढोशी ग्रामपंचायत सदस्य रमेश जाधव, भीमराव लोहार यांच्यासह कार्यकर्त्यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

## सारणी-उर्से रस्त्यावर मोऱ्यांना संरक्षण कठडे नसल्याने अपघात



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०४, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील सारणी, निकावली, आंबिवली, म्हसाड, उर्से व साये या गावांना जोडणारा मुख्य रस्ता अलीकडेच कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आला आहे. मात्र नव्याने करण्यात आलेल्या या रस्त्यावरील अनेक ठिकाणी नाल्यांवर बसवलेल्या मोऱ्यांना संरक्षणासाठी कठडे न बसवल्याने वाहनचालकांना रस्त्याची योग्य कल्पना न येता अपघाताचा धोका वाढला आहे.

निकावली – मेरे पाडा परिसरात मंगळवारी रात्री अशाच एका मोरी जवळ संरक्षण कठडा नसल्यामुळे साये येथील एका मोटारचालकाचे वाहन थेट खालच्या खोल भागात कोसळले. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असून चालक किरकोळ जखमी झाला. उपस्थित ग्रामस्थांनी तत्काळ मदत करून त्यांना बाहेर काढले. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्याचे काम गेली दोन वर्षे सुरु असून अद्याप अनेक ठिकाणी काम अपूर्ण आहे. काही ठिकाणी नव्याने टाकलेला रस्ता देखील उखडून खराब झाला आहे. अत्यंत कासव गतीने व दर्जाहीन पद्धतीने काम होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात प्रहार संघटनेचे डहाणू तालुका सचिव जितेश पाचलकर यांनी तीव्र रोष व्यक्त केला आहे. त्यांनी सांगितले, जवळपास सर्वच मोऱ्या उघड्या पडल्या आहेत. यामुळे जनतेच्या जीवाशी खेळ चालला आहे. संबंधित ठेकेदाराला बांधकाम विभागातील काही अधिकारी जाणीवपूर्वक पाठीशी घालत आहेत. रस्त्याचे काम अपूर्ण, हलगर्जी आणि मानकाच्या विपरित केले असल्याने याबाबत आम्ही लेखी तक्रार देणार आहोत.

## लासलगावला संत ज्ञानेश्वर माऊली मंदिरात दीपोत्सव



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०४, विंचूर (नाशिक) :** लासलगाव येथील संत ज्ञानेश्वर माऊली मंदिरात कार्तिकी एकादशी निमित्त मोठ्या भक्तीभावाने दीपोत्सव साजरा करण्यात आला. सुरुवातीला राम रक्षा स्तोत्र व हनुमान चालिसाचे सामूहिक पठण करण्यात आले. यावर्षी दीपोत्सवाचे तिसरे वर्ष असून, मंदिर परिसरात तब्बल ५०१ दिव्यांची रोषणाई करण्यात आली होती.या तेजस्वी दीपांनी संपूर्ण परिसर उजळून गेला आणि भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. दीपप्रज्वलनाचा मान टीव्ही नाईनचे रिपोर्टर उमेश पारीख यांना देण्यात आला. कार्यक्रमास कृषीमित्र सचिन होळकर, तसेच चझडउ मध्ये यश मिळवणारे सुमित सोनार व त्यांचे कुटुंब, तसेच उषाताई जोशी (शिर्डी) यांची मान्यवर उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात भाजपा लासलगाव मंडल सरचिटणीस निलेश जगताप, हरित सेना व ब्राह्मण सेवा मंडळाचे ऋषिकेश जोशी, मैत्रेयी महिला मंडळ अध्यक्षा तथा ब्राह्मण महासंघ विश्वस्त स्मिता कुलकर्णी, स्नेहा जोशी व मंदिराचे पुजारी सुशील जोशी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. पूनम तांबे, वैशाली शिंदे, सोनाली काळे, खुशी इंगळे, खुशी फापाळे यांनी मंदिराची केलेली अद्वितीय फुलांची सजावट विशेष आकर्षण ठरली. कार्यक्रमाला तृप्ती केंगे, प्राजक्ता भंडारी, रजनी कुलकर्णी, सुजाता भंडारी, मंजू देवळे, भाग्यश्री जोशी, अक्षदा जोशी, अदिती जोशी, प्रथमेश कुलकर्णी, आराध्या जोशी, अनुष्का जोशी यांसह अनेक भाविकांनी हजेरी लावली. संत ज्ञानेश्वर माऊली परिवारातील सदस्यांनी परिश्रमपूर्वक आयोजन करून दीपोत्सव भव्य व सफल केला.

# थोडक्यात

## ग्रामीण लोककला ही महाराष्ट्राची खरी संस्कृती - सरोदे

### सावरगाव येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार वितरण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण लोककलेच्या माध्यमातून पिढ्यान पिढ्या समाज प्रबोधनाचे काम करित असून त्यांच्या कामाची कदर आणि कौतुक करणे कर्तव्य समजून जुनी ग्रामीण लोककला हीच खरी महाराष्ट्राची संस्कृती असल्याचे प्रतिपादन लोककलावंत सांस्कृतिक विचार मंच महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष गवनेरजी सरोदे यांनी केले. पारनेर तालुक्यातील सावरगाव येथे यशस्वीनी जनसेवाभावी संस्था अंबड व पारनेर तालुका बलुतेदार संघटना जय मल्हार क्रांती संघटना पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर व विविध कला क्षेत्रात काम करण्याऱ्या कला कारांना पुरस्कार वितरण सोहळ्यात अध्यक्ष पदावरून ते बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बेल्हे येथील साईकृपा पतसंस्थेचे चेअरमन वसंतराव जगताप चित्रपट निर्माते रामदास राऊत प्राचार्य शिवाजी सावंत लावणी कलावंत स्वाती पुणेकर लोकशाहीर दत्ता जाधव करंदीकर लोककलावंत संघटनेचे तालुका अध्यक्ष सुनिल बर्वे भिवसेन साळवे रविंद्र राजदेव यांच्या सह मान्यवर उपस्थित होते. सरोदे पुढे बोलताना म्हणाले, ग्रामीण कलाकारांमुळे भारतीय संस्कृति टिकुन आहे संस्कृतिचे जतन होत आसताना कलावंताच्या पोटाचाही प्रश्न महत्वाचा आहे म्हणून कलावंताचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आपण मोठ्या प्रमाणावर जनअंदोलन उभारणार असून शासनाने कलावंताच्या मानधना बरोबरच त्यांच्या विविध प्रश्नाची सोडवणुक करावी. प्रमुख पाहुणे वसंतराव जगताप यावेळी बोलताना म्हणाले ग्रामीण कलाकारांचे जीवन फार कष्ट प्रद आसून त्यांच्या कलेचा आणि कष्टाचा योग्य मोबदला मिळत नाही. म्हणून ग्रामिण कलाकाराना लोकआश्रया बरोबरच राजाश्रय मिळणे गरजेचे आहे. लोककलावंताच्या विविध प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी आपण अग्रभागी राहु. रविंद्र राजदेव यावेळी बोलताना म्हणाले की, ग्रामीण कलावंताची एकजूट होणे अवश्यक आहे. त्यांच्या मानधनासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## पानोलीच्या उपसरपंचपदी अनुसया खामकर यांची बिनविरोध निवड



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पानोली गावच्या उपसरपंचपदी अनुसया बाबाजी खामकर यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली आहे. बायसा संजय काळोखे यांनी स्वेच्छेने आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या या जागेवर त्यांची निवड झाली. मासिक सभेत सर्व सदस्यांनी एकमताने अनुसया खामकर यांचा उपसरपंच पदासाठी ठराव मांडला आणि त्यांची बिनविरोध निवड केली. या महत्त्वपूर्ण निवडणुकीची प्रक्रिया निवडणूक अधिकारी दिंगबर काटे आणि सरपंच संदीप गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडली. सामाजिक कार्याची पार्श्वभूमी नवनिर्वाचित उपसरपंच अनुसया बाबाजी खामकर या समता परिषदेचे पारनेर तालुका अध्यक्ष आणि निलेश लंके युवा प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष नवनाथ खामकर यांच्या मातोश्री आहेत. नवनाथ खामकर यांच्या नेतृत्वाखाली खामकर परिवार सामाजिक आणि राजकीय कार्यात सक्रिय असून, गावच्या विकासकामांमध्ये त्यांचा नेहमीच पुढाकार असतो. त्यामुळेच अनुसया खामकर यांच्या निवडीमुळे गावाच्या विकासाला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.निवडीनंतर अनुसया खामकर यांच्यावर विविध क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. मिरवणुकीदरम्यान खासदार निलेश लंके यांचे बंधू दीपक लंके यांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी, पानोली गावचे सरपंच संदीप गाडेकर, सरपंच शिवाजी शिंदे,सरपंच मोहिनी भगत, उपसरपंच प्रशांत साळवे, उपसरपंच बायसा काळोखे, राजमाता पतसंस्थेचे संस्थापक डॉ. रामचंद्र थोरात, माजी सरपंच अनिलशेठ गाडेकर, दिलीप काळोखे, पोपट काळोखे, संजय काळोखे यांनी नवनिर्वाचित उपसरपंच अनुसया खामकर यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. या निर्णयामुळे पानोली ग्रामपंचायतीत महिलांच्या नेतृत्वाला अधिक बळ मिळाले असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## दापोली येथे सागरी मच्छिमार जनगणना प्रशिक्षण



**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.०३, दापोली (रायगड) :** दिनांक ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी दापोली फिशरीज ऑफिसमध्ये गणनाकर्ते यांना प्रशिक्षण देण्यात आले. राष्ट्रीय सागरी मासेमार जनगणना २०२५ ही सागरी मासेमारी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आयोजित करण्यात आली आहे. ही गणना ०३ नोव्हेंबर २०२५ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत भारतातील केंद्रशासित प्रदेशामद्धे राबविण्यात येत आहे. मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय, मंत्रालयाच्या वतीने सुमारे, चार हजार किनारी गावांमद्धे राहणाऱ्या १२ लाखांहून अधिक कुटुंबाना करणाऱ्या हा व्यापक माहिती संकलन प्रकल्प, आय.सी.ए.आर. केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्था (सी.एम.एफ. आर. आय.) तर्फे राबवली जात आहे. या कार्यक्रमात, फिशरी सर्वे ऑफ इंडिया (एफ.यस. आय.) हे सहकार्य करणारे संस्थान आहे. मत्स्यव्यवसायाशी समंधित बांधव आणि भगिनी, जे या क्षेत्रात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या कार्यरत आहेत, त्यांनी आपली माहिती आपल्याकडे येणाऱ्या गणनाकर्ते, द्यावी आणि सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे. याप्रसंगी परवाना अधिकारी, दीप्ती साळवी. वरिष्ठ टेक्निशियन, दिगंबर कुंभार. महेंद्र सोनावणे, प्रशिक्षणार्थी, स्वप्नील, रोमेश, कृष्णा, रिकी, अनिल, वृषाली, आदी सर्व उपस्थित होते.